# संत साहित्यातील क्रांतदर्शी संत चोखामेळा

प्रा. रेखा अढाव श्री.धाबेकर कला महाविद्यालय , खडकी, अकोला

---

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृती सर्वसमावेशक आाणि समन्वयवादी आहे. या संस्कृतीच्या अंतरंगात विविध परंपरा धर्म, पंथ नि संप्रदाय दिसुन येतात. भारतीय समाजरचना मूलतः धर्माधारीत नितीनियमांचे अनुसरण करणारी होती. ११-१२ व्या शतकात भारतीय समाजरचनेमध्ये विचारमंथन सुरु होते. १२ व्या शतकाच्या आगेमागे आपणास अनेक स्थित्यंतरे बघावयास मिळतात विशेषतः तत्पूर्वीचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन वैदिक धर्माला नि वैदिक विचांरधारेला अर्पण असल्याचे दिसते. बाराव्या शतकानंतर यात समाजामध्ये वैचारिक घुसमटिला प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात वर्णा-श्रमव्यवस्था, जातीव्यवस्था, कर्मसिद्धांत यांसारख्या कल्पना आपली पाळेमुळे खोलवर रुजवून बसल्या होत्या. शब्दप्रमाणाचे प्राबल्य समाजमनामधे गहिऱ्या प्रकारे रुतून बसले होते. वर्णाश्रमव्यवस्थेनुसार जातीभेदाच्या पलीकडे जाऊन निकोप समाजरचना निर्माण होणे निकडीचे झाले होते. विषमतेच्या तत्वावर आधारीत समाजरचनेमध्ये बहुजनवर्ग होरपळला जात होता. या काळास धर्मग्लानीचा काळ म्हणून बघता येईल. वैदिक प्रथा-परंपरा नि नियामांच्या जाचकतेतून सुटून मोकळा श्वास घेण्यामध्ये समाज प्रयत्नरत होता. समाजरचनेत विषमतेचा प्रभाव अधिक होता. यज्ञयाग, व्रतवैकल्ये, जपजाप्य एवढयाच कर्मकांडाकरिता वैदिक परंपरेने आपली सर्व शकती खर्च घातली होती. बदलत्या परिस्थितीनुसार समाजमनाला नवप्रेरणा देण्याची क्षमता वैदिक धर्मात उरली नाही. नैतिक मूल्य जगण्यातून हद्दपार झाली होती. अनिष्ट कर्मकांडाना समाजात अवास्तव महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. अशाही परिस्थितीत हेमाद्री पंडितांनी स्मृतिग्रंथावर आधारीत टीकेच्या आधारे वैदिक धर्माचरणाची विस्कटलेली व्यवस्था पुनरुज्जिवीत करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. दरम्यान वैदिक परंपरा निष्प्रभ झाली होती. यज्ञयाग, व्रतवैकल्ये इत्यादीसारख्या कर्मकांडाचे समाजात प्राबल्य माजले होते. उच्चवर्णिय आणि पंडित वर्गानी समाजमनाला आध्यातिक पातळीवरील योग्य ते मार्गदर्शन करण्याची आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली नाही. ज्यांच्याकडुन बहुजनसमाजाला आध्यात्मिक प्रश्नांच्या उत्तरांची अपेक्षा होती ते कर्तव्यपराङ्मुख झाले होते. तत्कालिन परिस्थितीचे वर्णन करावयाचे झाल्यास संत तुकारामांच्या शब्दात पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल. -

अर्थे लोपली पुरावे । नाश केला शब्दज्ञाने ।
विषयलोभी मने । साधने बुडविली

अशा प्रकारे समाजाची अवनती झाली होती. बहूजनवर्गाच्या वाटयाला पशुतूल्य जीवन कंठण्यावाचून पर्याय उरला नव्हता. बहुजनवर्गाची जी धर्मभावना बागळून होता तिला समाजातील तथाकथित सतांकडून कधी योग्य मार्गदर्शन प्राप्त झाले नाही. परिणामी बहुजनवर्गाची धर्मभावना अंधश्रध्देकडे झुकू लागली होती. परिणामी समाजातील बहुजनवर्ग अधिकच नाडल्या गेला, पिडल्या गेला.

आध्यात्मिकतेच्या नावाखाली बहुजनवर्गाचे समाजमन काळवंडून गेले होते मात्र असे असले तरी काही आशेचे किरण भास-आभासाप्रमाणे दिसून येते होते. काळवंडलेली मने निरभ्र-निर्मळ करण्याकरिता वारकरी संप्रदाय जणू सूर्य प्रकाशासारखाच अवतीर्ण झाला होता. वारकरी संतांनी प्रथमच मराठी भाषेतील आपल्या रचना बहुजनवर्गाला सर्मपित केल्याचे दिसून येते. समाजातील बहुतांश लोकांना, शुदानिशूद्रांच्या धार्मिक भावनेला वारकरी संतांनी अध्यात्मविचाराची जोड दिली. बहुजनांना आपलेसे वाटणाऱ्या मातृभाषेतूनच आध्यात्मिक तसेच वैचारिक तत्त्वांची मांडणी केली. सर्वसामान्यांच्या धर्मभावना समजून घेऊन त्यांच्या उध्यात्मविचारांचा परिपोष होईल यादृष्टीनेच संतांनी आपल्या विचारांची मांडणी केली असलयाचे दिसून येते.

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरादि कांपासून तो संत तुकाराम, संत सेना न्हावी, संत गोरोबा, संत चोखोबा पर्यंतच्या संताची समदृष्टी असल्याचे दिसून येते.

वारकरी संप्रदायाच्या या नविविचारांचे बहुजनवर्गाने जोरदार स्वागत केले नि आपल्या आजपर्यंतच्या मृतवत अध्यात्मचिंतनाला एक नवसंजीवनी प्राप्त झाल्याचे समाधान त्यांना मिळाले. बहुजनवर्गातील अध्यात्मविचारात असलेल्या अनेकांना नवचैतन्य प्राप्ती झाली. जे निष्ठावंत नि प्रामाणिक भक्त होते त्यांना तर मोठी पर्वर्गीय प्राप्त झाल्याचा आनंद झाला. वारकरी संप्रदाय हा सर्व समावेशक आणि सर्वसंग्राहक होता. कर्मकांडाना नि प्रतिमा प्रतिकांना कवटाळून मानवतेचा बळी देणारा हा पंथ नव्हे. लोकभाषा हीच वारकरी संप्रदायाची भाषा असल्यामुळे लोकांची तीविषयीची आपुलकी अधिक वाढली. सोबतच कुठल्याही सोवळया-ओवळयांच्या जाचक संकल्पनांचा अंतर्भाव या संप्रदायात नसल्यामुळे सर्वसामान्यांना या संप्रदायाचे आचरण सहज - सुलभ वाटले.

वारकरी संप्रदायाचे सर्वात महत्वाचे तत्त्व म्हणजे 'कमईशु भजावा' सोबतच नलगे सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण । अशी स्पष्ट आणि ठाम भूमिका या संताची होती. त्यामुळेच आपल्या प्रापंचिक जबाबदाऱ्या पार

पाडुन आपल्या अध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वारकरी संप्रदायाच्या विचारपिठाचा वापर अनेक संतांनी करुन घेतल्याचे दिसून येते.

वारकरी संप्रदायातील सर्वसमावेशक तत्त्वज्ञानामुळे तळागाळातील प्रत्येकाला आपल्या भक्तीभावनेच्या संकल्पनेला मूर्त स्वरुप देता आले. वारकरी संप्रदायाच्या समतेच्या झेंडयाखाली बहुजन वर्ग एकत्रित येऊन आपली ज्ञानसाधना सहज करु शकत होता. संत चोखामेळा यांचा उल्लेख आपल्याला एक विचारवंत संत कवी म्हणून करावा लागेल. आपल्या स्थितीगती विषयीचा विचार चिंतन मननातून त्यांनी विशद केला आहे. आपल्या जगण्याचे प्रयोजन त्यांना कळले होते. मात्र समाजमनातील विषमता त्यांना अस्वस्थ करीत होती. एक सामान्य व्यक्ती म्हणून आपल्याला समाजात वावरता यावे एवढीच माफक अपेक्षा त्यांची होती. लौकिकार्थाने संत चोखामेहा निरक्षर असले तरी त्यांची कात्यप्रतिभा अनेक प्रश्न सहजपने निर्माण करतांना दिसते त्यांच्या रचनेत ते म्हणतात -

‘अवघ्या वर्णामाजी हीन केली जाती ।’
विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी ।।
कोणीही अंगिकार न करिता माझा । दूर दूर होजा अवघे म्हणती ।।

आपल्या समाजातल्या वर्णाश्रमव्यवस्थे विषयी तसेच जातीव्यवस्थेविषयी त्यांच्या मनामध्ये प्रारंभी न्यूनभावना होती. चोखोबांनी आपल्या शूद्र जातीत जन्मलेल्या घटनेला प्रेरणा बनविले आणि समतेच्या आधारावर जगण्यासाठीचा त्यांनी चंग बांधला. संत चोखोमेळयानी अतिशय विचारपूर्वक आपल्या जगण्याचा नि समाजरचनेचा अभ्यास केल्याचे दिसून येते. मात्र कुठेही विद्राहात्मक मांडणी त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. आपल्या विचारस्वातंत्याविषयी चोखोबा ठाम होते. आपले व्यक्ति स्वातंत्र्य त्यांनी अबाधित राखले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारांनी भारलेले त्यांचे मन समाजातील विषमता बघून विषन्न होतांना दिसते. असे असले तरी आपल्या मनन चिंतनातून तयार होणाऱ्या मताची जबाबदारी आपलीच आहे असे त्यांना वाटते. आपले जगणे आपण बारकाईने तपासून त्याची जबाबदारी आपली आपणच घ्यावी याविषयीचे विचार चोखोबा खालीलप्रमाणे मांडतात -

आपले आपण करावे कारण । दूनियासी खूण नकलेचि ।
जयाचा ठेवा तो तयासीच ठावा । येरा कळे हेवा त्याचा काही ।।
जयाची ती खूण तयासीच ते ठावी । येरा नेणे जीवी सोय त्याची ।।
चोखा म्हणे माझा नामया तो मला । उगाणा दाविला अनुभवाचा ।।

चोखोबांना जीवनामध्ये अनेक प्रश्न आणि समस्यांचा सामना करावा लागला. मात त्यांचे मनोबल पक्के असल्यामुळे कुठल्याही विषमतेच्या हादऱ्यांनी ते घाबरले नाहीत, हरले नाहीत आपल्या जातीविषयीचे भावना त्यांना स्पष्ट होती मात्र देव हा भावाचा भुकेला आहे त्याला जाती आधारीत वर्चस्वभावना मान्य नाही याविषयीची स्पष्टता त्यांच्या ठिकाणी होती. समाजाध्ये जगतांना आलेले विदारक अनुभव त्यांनी अतिशय संयमपणे परंतु ठामपणे मांडलेले आहेत. समाजातील तथाकथित पंडित साधूना त्यांनी कधी भिक घातली नाही किंवा कुणाची भिड बाळगली नाही आपली सच्ची भावना त्यांनी समर्थपणे मांडली आहे -

आपले आपण करावे कारण । दूनियासी खूण नकलेचि ।
हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्यारिती ।
माझा लागताची कर । सिंतोडा घेताती करार ।
अवघ्या वर्णी माझी हीन केली जाती । विटाळ विटाळ म्हणती, क्षणोक्षणी ।
कोणीही अंगिकार माझा न करिती । दूर दूर हो अवघे म्हणती ।
चोखा म्हणे तुम्ही घ्याल पदरी । तरीच हरी मज सुख होय ।

संत चोखोबा थेट विठ्ठलाकडे आपली कैफियत घेऊन गेल्याचे दिसून येते. आपली तक्रार इतर कुणाकडे न करता थेट आपल्या देवताकडेच आपले मन मोकळे करुन देण्याचा प्रयत्न तयांनी केला. आपल्या जातीवरुन आपल्याला दुय्यम वागणूक मिळते याची बोच त्यांच्या मनात होती. परंतु जातीच्या भरवश्यावर ज्यांनी स्वतःल श्रेष्ठ मानलेले आहे त्यांच्या जगण्यातली अमानवियता बघून त्यांच्या श्रेष्ठत्वाची किव कराविशी वाटते. आपल्या अभंगरचनेत ते म्हणतात -

आला परदेही पाही । शुद्रधी नेणे ठायीचे ठायी ।
करी प्रचंड काबाड । भारवाही खर द्वाड ।
न ये रामनाम मुखी । नाही कधी संत ओळखी ।
करी वाद-अपवाद । नाही अंतःकरण शुद्ध ।

मळ नसोनी निर्मळ । चोखा म्हणे गंगाजल ।

संत चोखोबांनी समाजातील अवास्तव मान्यता आणि प्रथा परंपरांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. त्यांच्यामते हया प्रथा परंपरानी समाजामध्ये दुही निर्माण केल आहे. माणसामाणसात भेद निर्माण केला आहे. त्यामुळे अशा हया अनिष्ट मान्यतांना समाजातील विचारवंतांनी आपल्या आचार विचारानीच मूठमाती दिली पाहिजेत. अशा हया विषमतेच्या नि अस्थिरतेच्या वातावरणात एक विठोबाच त्यांना आपलासा वाटतो ते म्हणतात -

अनादि निर्मळ वेदाचे जे मूळ । परब्रह्मा सोज्वल विटेवरी ।
जयालागी अहोरात्र विवादती । तो भक्ताचिये प्रीती उभा असे ।
शीणल वेद चारी । साही नेणती निर्धारी ।
तो आपलीया लाजा । धावे भक्ताचिया काजा ।

वेदविद्यासंपन्न असणारा समाजातला वर्ग मात्र बहुजनांची नाडवणूक करायचा देवा-धर्माच्या नि जाती-पातीच्या आधारावर समाजामध्ये संभ्रम निर्माण झाला होता. चोखोबांनी मात्र सर्वप्रकारचे विषमतावादी विचार सोडून आपल्या अध्यात्मिक उन्नतीची कास धरली. अस्पृश्यते विषयीच्या विचारांविषयी ते म्हणतात -

वेदासी विटाळ शास्त्रासी विटाळ । पुराणे अमंगळ विटाळाची ।
जीवासी विटाळ शिवासी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।
ब्रम्हीया विटाळ विष्णूसी विटाळ । शंकरा विटाळ अमंगळ ।
जन्मता विटाळ मरता विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंती ।

जातीहीनतेमुळे होणाराअन्याय सहन करण्याची मानसिकता चोखोबांची नव्हती. व्यक्तिगत दुःखाची अन्यायाची बाजू जरी चोखोबांनी विठ्ठलासमोर मांडली असली तरी त्यांच्या दृष्टिकोन समाजाभिमुख होता. असे असले तरी चोखोबांचा कधी कधी तोल सुटून ते विठ्ठलावर शेप व्यक्त करतांना दिसतात -

कशासाठी तुम्हा शरण रिधावे ।आमुचे वारावे सुख दुःख ।
आमुचे संचित भोग क्रियामाण । तुमचे कारण तुम्ही जाणा ।
आमुचा तो येथे खुंटलासे लाग । न दिसे मारग मोकळायि ।
चोखा म्हणे काम करु आता । तुमची हे सत्ता अनावर ।

विठ्ठलाविषयीची अपार भक्ती आणि श्रध्दा जरी चोखोबांच्या मनात घर करुन होती तरी देखील काही प्रशनांसंबंधी त्यांच्या डोक्यात उलटसुलट प्रश्नांची मालिका सुरु होती. आपल्या प्रश्नांना काव्यातून मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून येते. चोखोबांची काव्यनिर्मिती मागील प्रेरणा ही आत्मोध्दार आणि समाजबांधवांच्या उद्धाराची तळमळ होती. आपल्या समाजबांधवांबददलची तळमळ त्यांच्या काव्यातून दिसून येते. सोबतच जनकल्याणाची भावना प्रबळ होती.

तत्कालीन समाजात व्रतवैकल्ये, कर्मकांड, देवतांनी अनागोंदी निर्माण केली होती. त्या काळात जातीभेद, स्पृश्यास्पृश्यतेनी कळस गाठला होता. त्या सामाजिक अनिष्ट बजबजपुरीला कंटाळलेल्या चोखोबांनी काव्यातून निषेध नोंदविलेला दिसतो. आपल्या निर्मळ भक्तीच्या बळावर चोखोबांनी विठ्ठलाशी जवळीक साधली **'देव भावाचा भुकेला आहे'** याविषयी त्यांच्या मनात संदेह नव्हता. त्यातूनच चोखोबांचे मनोधैर्य वाढले **घसत्य असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ।'**यांप्रमाणे संत चोखोबांनी कुठल्याही मान्यतेची पर्वा न करता साक्षेपी दृष्टीने समाजातल्या आचार विचारांची समीक्षा केली. दरम्यान कर्मकांडाचे नि वैदिक परंपरेचे अवास्तव महत्त्व त्यांनी नाकारुन त्यातील फोलपणा सिदध करण्याचा प्रयत्न केला

धिक तो आचार धिक तो विचार । धिक तो संसार धिक जन्म ।
धिक ते पठण धिक ते पुराण । धिद यज्ञ हवन केले तेणे ।
धिक ब्रम्हज्ञान वाउग्या हया गोष्टी । दया क्षमा पोटी शांती नाही ।।
धिक ते आसन जटाभार माथा । वायाचि हे कंथा धरिली तेणे ।
चोखा म्हणे धिक जन्मला तो नर । भोगी नरक घोर अंतकाळी ।

वेदादी कर्मकांडाना श्रेष्ठत्वाचा दर्जा अर्पण करुन वेदादी कर्मकांडाचे प्राबल्य समाजात निर्माण करणाचा तथाकथित संधीसाधूना चोखोबांनी वरील अभंगाद्वारे चपराक लावल्याचे दिसून येते पुराण आणि कर्मकांडावरच ज्या लोकांच्या धर्मभावनेचा पाया उभा होता त्या पायालाच नाकारण्याची हिंम्मत संत चोखोबांनी दाखविली जनमता वर जो मान्यतांचा प्रभाव होता त्याचा परिणाम चोखोबांवर झाला नाही.

लौकिक अर्थाने चोखोबा शिक्षीत नसले तरी समीक्षकाची नि अभ्यासकाची दृष्टी त्यांच्याकडे जात्याच होती. आपल्या विचारमंथनातून त्यांना जे ज्ञानरुपी अमृत गवसले होते तो ठेवा त्यांनी समाजापर्यंत पोहोचविला होता. आपली विठ्ठलभक्ती विशुद्‌ध भावावर आधारित असून कुठल्याही लाभाची अपेक्षा आपणास विठ्ठलाकडून नसल्याचे चोखोबा सांगतात. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे असून आपसात मतभेद का? याविषयी त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. विठ्ठलाला सर्व भक्त समान आहेत तो कुणातच भेदभाव करीत नाही. उच्च निचता ही माणसाच्या जगणतून हद्‌दपार झाली पाहिजे. रंगारुपावरुन, जातीधर्मावरुन समाजात माणसाचे असलेले श्रेष्ठत्व अमान्य करीत त्याविषयीचा नकाराधिकार चोखोबांनी वापरल्याचे दिसून येते. ते पुढील प्रमाणे -

उस डोंगा परि रस नोहे डोंगा | काय भुललासी वरलीया रंगा |
कमान डोंगी परी तीर नाहे डोंगा | काय भुललासी वरलीया रंगा |
नदी डोंगी परी जळ नाहे डोंगे | काय भुललासी वरलीया रंगा |
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा | काय भुललासी वरलीया रंगा |

वरवरच्या दिखाऊपणाला बळी न पडता वास्तविकता काय आहे हे समजून घेणे आणि त्यानुसार आपले वर्तन ठेवणे. व्यवस्थेला पूरक आहे असे चोखोबांचे मत होते.

वारकरी संप्रदायाच्या झेंडयाखाली एकत्र ऐऊन सर्वधर्मसमभावाने कार्यरत असणारे संत आपला आर्तस्वर स्पष्टपणे मांडू शकले. संत चोखोबांच्या ठिकाणी असलेली ईश्वरभक्ती ही शुदध नैतिकतेच्या अधिष्ठानावर आधारीत होती. मानवियतेचा पुरस्कार करणाऱ्या संत चोखोबांनी अमानविय आचरणावर आणि ततसंबंधी कर्मकांडावर चाबूक उगारला होता. नवसमाज निर्मिती द्वेषेरहित नि भेदभंवरहित समाजव्यवस्था जर अस्तित्वात यायची असेल चोखोबांच्याच विचाराशिवाय समाजाला पर्याय चोखोबांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास.

अनादि निर्मळ वेदाचे जे मूळ | परब्रम्ह सोडवळ विटेवरी |
जयालागी अहोरात्र विवादती | तो भक्तीचिये प्रीती उभा असे |
शीणले वेद चारी | साही नेणती निर्धारी |
तो आपलिया लाजा | धावे भक्ताचिया काजा ||

ज्या संतांने जीवनात स्पृश्यास्पृश्यता जवळून अनुभवली नि त्याचे दाहक चटके अनुभवले त्याच संतांने आपल्या विचारमंथनातून वरील विचार व्यक्त केला आहे. आपल्या स्वच्छ, निर्मळ जगण्यातून चोखोबांना सत्यत्वाची प्रचिती आली त्याचेच रुपांतर त्यांनी काव्यप्रतिभेच्या माध्यमातून केले. संत चोखोबांनी आपल्या आचारविचारातून संतपरंपरेचा मानविय दृष्टीकोण पुरेपुर जपला. जगला विशुद्‌ध अंतःकरणातून स्त्रवलेल्या भक्तीमहिम्याला कुठल्याही तथाकथित मर्यादांचे कुंपण पडणे शक्य नसल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची**


१) संत वाङमयाची सामाजिक फलश्रुति : गं.बा. सरदार
२) प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास : डॉ. अ. ना. देशपांडे
३) मराठी वाङमयाचा इतिहास : ल.रा. पांगारकर
४) चोखा मेळा चरित्र : स.भा. कदम
५) संत साहित्य आणि लोकसाहित्य : रा. चि. ढेरे
६) परि भाव नोहे डोंगा : ; ज.गो. संत